व्यंकटेश महाविद्यालयात महिला दिन साजरा

श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एस एच आंबवडे होत्या. महिलांचा सन्मान, प्रशंसा व महिलांप्रती आदर व प्रेम भाव निर्माण व्हावा त्यांना सन्मानपूर्वक वागणूक मिळावी यासाठी आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे महत्त्व आहे. महिला सक्षमीकरण सबलीकरण व उन्नती हा मुख्य उद्देश साध्य करण्यास मदत होते. सदर कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील महिला दिनावर मनोगते, गीत, नृत्य व नाट्य सादरीकरण करण्यात आले. प्रामुख्याने हर्षदा, समृद्धी सुतार, श्रेया बोरवडे, ऋतुजा या विद्यार्थिनींनी आपले सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रास्ताविक कुमारी मोहिनी अंचालियाआणि आभार प्रदर्शन सबिया बाणदार यांनी केले.

